StudentBounty.com



# Sociology
## Paper II
# समाजशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains Fifty (50) multiple choice questions, each question carrying Two (2) marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास** (50) बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Pareto distinguished between :
   (A) Traditional and rational action
   (B) Logical and non-logical action
   (C) Personal and social action
   (D) Altruistic and egoistic action

2. Which of the following scholars is *not* related with the interactionist perspective ?
   (A) Homans
   (B) Parsons
   (C) Blumer
   (D) Mead

3. A philosophy that claims an objective analysis of empirical phenomena with a non-partisan view is ..........
   (A) Epistemology
   (B) Interpretivism
   (C) Neo-functionalism
   (D) Positivism

1. परेटोने कशामध्ये भेद दर्शविला ?
   (A) पारंपरिक आणि बुद्धीनिष्ठ क्रिया
   (B) तार्किक व अ-तार्किक क्रिया
   (C) वैयक्तिक व सामाजिक क्रिया
   (D) परार्थवादी आणि आत्मनिष्ठ क्रिया

2. खालीलपैकी कोणता विचारवंत आंतरक्रियात्मक दृष्टीकोनाशी संबंधित **नाही** ?
   (A) होमान्स
   (B) पार्सन्स
   (C) ब्लूमर
   (D) मीड

3. अनुभवनिष्ठ घटनांच्या निष्पक्ष आणि वस्तुनिष्ठ विश्लेषणाचा दावा करणारे तत्वज्ञान कोणते ?
   (A) ज्ञानमीमांसाशास्त्र
   (B) अन्वयार्थवाद
   (C) नव-प्रकार्यवाद
   (D) प्रत्यक्षवाद

[P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com



4. Who among the following is associated with the term "Reference group" ?

(A) Robert Merton

(B) Talcott Parsons

(C) Erving Goffman

(D) Vilfredo Pareto

5. Match the following theory and thinkers and select the correct answer from the codes given below :

| Theory | Thinker |
|---|---|
| (*a*) Hegemony | (*i*) M. Weber |
| (*b*) Conflict | (*ii*) G. Mead |
| (*c*) Social Action | (*iii*) A. Gramsci |
| (*d*) Symbolic interactionism | (*iv*) R. Dahrendorf |
| | (*v*) Levy-strauss |

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*iii*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |

4. खालीलपैकी कोण 'संदर्भ समूह' या संकल्पनेशी संबंधित आहे ?

(A) रॉबर्ट मर्टन

(B) टालकॉट पार्सन्स

(C) इरविंग गोफमन

(D) विल्फ्रेड परेटो

5. खालीलपैकी सिद्धांत आणि विचारवंत यांच्या जोड्या जुळवा आणि उचित पर्याय दिलेल्या कोड मधून निवडा :

| सिद्धान्त | विचारवंत |
|---|---|
| (*a*) प्रभुत्व | (*i*) एम्. वेबर |
| (*b*) संघर्ष | (*ii*) जी. मिड |
| (*c*) सामाजिक कृती | (*iii*) अे. ग्राम्शी |
| (*d*) प्रतिकात्मक आंतरक्रियावाद | (*iv*) आर. डॅन्हेनडॉर्फ |
| | (*v*) लेवी–स्ट्रॉस |

**कोड :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*iii*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |



www.StudentBounty.com

StudentBounty.com



6. Karl Marx viewed revolution as :

   (A) Political accident

   (B) Social expression of a historical movement

   (C) Religious upliftment

   (D) Moral manifestation of society

7. Who of the following is known for functionalist interpretation of social stratification :

   (A) Talcott Parsons

   (B) C.W. Mills

   (C) Max Weber

   (D) R.K. Merton

8. Generally speaking, in an industrial society, individual's occupational status is :

   (A) Conferred

   (B) Achieved

   (C) Ascribed

   (D) Determined by caste

6. कार्ल मार्क्सने क्रांतीकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले आहे ?

   (A) राजकीय अपघात

   (B) ऐतिहासिक चळवळीची सामाजिक अभिव्यक्ती

   (C) धार्मिक उन्नती

   (D) समाजाच्या नैतिकतेचे प्रकटीकरण

7. पुढीलपैकी कोणता शास्त्रज्ञ सामाजिक स्तरीकरणाच्या कार्यात्मक अन्वयार्थासाठी ओळखला जातो ?

   (A) टालकॉट पारसन्स

   (B) सी.डब्ल्यू. मिल्स

   (C) मॅक्स वेबर

   (D) आर.के. मर्टन

8. सामान्यत: औद्योगिक समाजात व्यक्तीचा व्यावसायिक दर्जा हा कसा असतो :

   (A) बहाल केलेला

   (B) स्वसंपादित

   (C) प्रदत्त

   (D) जाती दर्जावर निर्धारित



www.StudentBounty.com

StudentBounty.com



9. A change of position that does not result in higher or lower status is called :
   (A) Horizontal mobility
   (B) Vertical mobility
   (C) Inter-generational mobility
   (D) Intra-generational mobility

10. In which type of research study, proposing hypothesis is *not* considered necessary ?
    (A) Exploratory Research
    (B) Diagnostic Research
    (C) Experimental Research
    (D) Case study

11. The tentative proposition that is put to empirical test is called :
    (A) Questionnaire
    (B) Interview
    (C) Objective
    (D) Hypothesis

9. जेव्हा एखाद्या स्थानातील परिवर्तनाचा उच्च अथवा कनिष्ठ दर्जावर परिणाम होत नाही, तेव्हा त्याला काय म्हणतात ?
   (A) समस्तरीय गतिशीलता
   (B) ऊर्ध्व गतिशीलता
   (C) आंतरपिढीय गतिशीलता
   (D) पिढीअंतर्गत गतिशीलता

10. संशोधन अध्ययनाच्या कोणत्या प्रकारात गृहीतक मांडणे गरजेचे **नसते** ?
    (A) अन्वेषणात्मक संशोधन
    (B) निदानात्मक संशोधन
    (C) प्रयोगात्मक संशोधन
    (D) व्यष्टी अध्ययन

11. अनुभवाश्रित चाचणीसाठी मांडल्या जाणाऱ्या तात्पुरत्या विधानाला काय म्हणतात ?
    (A) प्रश्नावली
    (B) मुलाखत
    (C) उद्दिष्ट
    (D) गृहितक



www.StudentBounty.com

StudentBounty.com



12. According to Durkheim, which one of the following is *not* a feature of social fact ?

(A) Generality

(B) Constraint

(C) Externality

(D) Individuality

12. दुर्खिमच्या मते खालीलपैकी कोणते सामाजिक तथ्याचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) सामान्य वितरण

(B) वर्तन-नियंत्रण क्षमता

(C) व्यक्ती बाह्यता

(D) व्यक्तिगतता

13. Which of the following pairs is *not correct* ?

| | | |
|---|---|---|
| (A) | Social action | — Merton |
| (B) | Symbolic Interactionism | — Blumer |
| (C) | Social Fact | — Durkheim |
| (D) | Circulation of Elites | — Pareto |

13. खालीलपैकी कोणती जोडी योग्य **नाही** ?

| | | |
|---|---|---|
| (A) | सामाजिक क्रिया | — मर्टन |
| (B) | प्रतीकात्मक आंतरक्रियावाद | — ब्लूमर |
| (C) | सामाजिक तथ्य | — दुर्खीम |
| (D) | शिष्टजनांचे अभिसरण | — परेटो |

14. Who of the following is recognized as an exponent of 'Ethnomethodology' ?

(A) H. Garfinkel

(B) J. Habermas

(C) E. Goffman

(D) M. Foucault

14. 'लोकान्वय पद्धतीशास्त्र' याचा उद्‌गाता म्हणून खालीलपैकी कोणास ओळखले जाते ?

(A) एच. गार्फिंकल

(B) जे. हॅबरमास

(C) ई. गॉफमन

(D) एम. फुको



www.StudentBounty.com

StudentBounty.com



15. Whose definition of religion refers to "a unified system of beliefs and practices relative to sacred things" ?

(A) E.B. Tylor

(B) James J. Frazer

(C) Gerhard Lenski

(D) Emile Durkheim

16. Family of procreation is described as one in which :

(A) one becomes a parent

(B) one gets education

(C) one is born

(D) one gets shelter

17. Sociologically speaking "Religion" is :

(A) Group phenomenon

(B) Natural phenomenon

(C) Supernatural phenomenon

(D) Sacred phenomenon

15. ''पवित्र गोष्टींच्या अनुषंगाने असणारा विश्वास आणि आचार यांची एकात्म व्यवस्था म्हणजे धर्म'' अशी धर्माची व्याख्या कोणी केली आहे ?

(A) इ.बी. टायलर

(B) जेम्स जे. फ्रेझर

(C) गरहार्ड लेन्स्की

(D) एमिल दुरखाईम

16. पुनरुत्पादन कुटुंब म्हणजे :

(A) व्यक्ती पालक बनते

(B) व्यक्ती शिक्षण घेते

(C) एखाद्याचा जन्म होतो

(D) एखाद्याली निवारा मिळतो

17. समाजशास्त्रीयदृष्ट्या ''धर्म'' ही :

(A) सामूहिक घटना

(B) नैसर्गिक घटना

(C) अतिनैसर्गिक घटना

(D) पवित्र घटना



www.StudentBounty.com

StudentBounty.com



18. According to whom, the mind is an inner conversation with one's self ?

(A) Vilfredo Pareto

(B) C.H. Cooley

(C) G.H. Mead

(D) Max Weber

18. 'स्वत:शीच केलेले आंतरिक संभाषण म्हणजे मन होय' असे कोण म्हणते ?

(A) विल्फ्रेड परेटो

(B) सी.एच. कूले

(C) जी.एच. मीड

(D) मॅक्स वेबर

19. Who among the following introduced the concepts of 'in-group' and 'out-group' ?

(A) C.H. Cooley

(B) W.G. Sumner

(C) R.K. Merton

(D) R. Linton

19. अंतर्समूह आणि बहिर्समूह या संकल्पना खालीलपैकी कोणी मांडल्या ?

(A) सी.एच. कूले

(B) डब्ल्यू.जी. समनर

(C) आर.के. मर्टन

(D) आर. लिंटन

20. Structured set of questions used by the researcher to collect information from the field by himself is known as :

(A) Interview schedule

(B) List of questions

(C) Observation

(D) Oral history

20. संशोधन क्षेत्रातून स्वत: माहिती मिळविण्यासाठी तयार केलेल्या प्रश्नांच्या संरचित संचाला काय म्हणतात ?

(A) मुलाखत पत्रिका

(B) प्रश्नांची यादी

(C) निरीक्षण

(D) मौखिक इतिहास



www.StudentBounty.com

StudentBounty.com



21. Participant observation involves :

    (A) Content analysis

    (B) Analysis of archival sources

    (C) Close and involved observation of the community

    (D) Historical analysis

22. What is the term used to refer to the method of assigning numerical symbols to the different categories of responses of the respondents ?

    (A) Coding of data

    (B) De-coding of data

    (C) Analysis of data

    (D) Tabulation of data

21. सहभागी निरीक्षणात कशाचा अंतर्भाव होतो ?

    (A) आशय विश्लेषण

    (B) पुराभिलेखीय दस्तावेज विश्लेषण

    (C) समुदायाचे त्यात गुंतून आणि जवळून केलेले निरीक्षण

    (D) ऐतिहासिक विश्लेषण

22. उत्तरदात्यानी दिलेल्या उत्तरांच्या विविध प्रवर्गांना संख्यात्मक प्रतीके देण्याच्या पद्धतीचा निर्देश करण्यासाठी कोणती संज्ञा वापरली जाते ?

    (A) तथ्यांचे सांकेतीकरण

    (B) तथ्यांचे विसंकेतीकरण

    (C) तथ्यांचे विश्लेषण

    (D) तथ्यांचे सारणीकरण



www.StudentBounty.com

StudentBounty.com



23. Which of the following tools is *not* used in survey method ?

    (A) Structured questionnaire

    (B) Precoded questions with coding manual

    (C) Interview with individual-specific probing questions

    (D) Questionnaire involving questions with multiple choice of answers

24. Reward and punishments associated with role expectations are called :

    (A) Norms

    (B) Values

    (C) Mores

    (D) Sanctions

23. खालीलपैकी सर्वेक्षणपद्धतीत कोणत्या साधनाचा वापर होत **नाही** ?

    (A) संरचित प्रश्नावली

    (B) संकेत पुस्तिके सहित सांकेतांक दिलेले प्रश्न

    (C) व्यक्तिविशिष्ट आणि सखोल माहिती मिळविणाऱ्या प्रश्नांचा समावेश असणारी मुलाखत

    (D) प्रश्न आणि बहुपर्यायी उत्तरांचा समावेश असणारी प्रश्नावली

24. भूमिकेशी जेव्हा बक्षीस आणि शिक्षा संबंधित असते तेव्हा त्याला काय म्हणतात ?

    (A) नियमने

    (B) मूल्ये

    (C) लोकनीती

    (D) अनुज्ञा



www.StudentBounty.com

StudentBounty.com



25. Rights and duties attached to a status is known as :

(A) Social value

(B) Social norm

(C) Social role

(D) Social status set

26. The method which is designed to collect data from large, diverse and widely scattered groups of people is known as ..................

(A) Interview

(B) Social survey

(C) Questionnaire

(D) Content analysis

27. Ralf Dahrendorf's conflict theory focuses on :

(A) Status

(B) Authority

(C) Education

(D) Economy

25. दर्जाशी संबंधित हक्क आणि कर्तव्ये याला काय म्हणतात ?

(A) सामाजिक मूल्य

(B) सामाजिक नियमन

(C) सामाजिक भूमिका

(D) सामाजिक दर्जा संच

26. मोठ्या, विभेदित व दूरवर पसरलेल्या लोकांच्या समूहाकडून माहिती मिळवण्यासाठी योजलेल्या पद्धतीला .................... म्हणतात.

(A) मुलाखत

(B) सामाजिक सर्वेक्षण

(C) प्रश्नावली

(D) आशय विश्लेषण

27. राल्फ डॅऱ्हेनडॉर्फ यांच्या संघर्ष सिद्धांत कशावर भर देतो ?

(A) दर्जा

(B) अधिकार

(C) शिक्षण

(D) अर्थव्यवस्था



www.StudentBounty.com

StudentBounty.com



28. Who among the following is the first sociologist to draw attention to primary and secondary groups ?
    (A) Cooley
    (B) Sumner
    (C) Comte
    (D) Parsons

29. "Structure and Function in Primitive Society" is the book written by :
    (A) B. Malinowski
    (B) Robert Merton
    (C) Tolcott Parsons
    (D) Radcliffe Brown

30. Levi-Strauss described structure as a :
    (A) Construct or abstraction
    (B) Interactionality or process
    (C) Real or functional whole
    (D) Reflection of collective consciousness

28. प्राथमिक व दुय्यम समूहाकडे लक्ष वेधणारा खालीलपैकी पहिला समाजशास्त्रज्ञ कोण ?
    (A) कूले
    (B) समनर
    (C) कॉम्ट
    (D) पारसन्स

29. ''स्ट्रक्चर अॅन्ड फंक्शन इन प्रिमिटीव्ह सोसायटी'' हा ग्रंथ कोणी लिहिला ?
    (A) बी. मॅलिनॉवस्की
    (B) रॉबर्ट मर्टन
    (C) टालकॉट पारसन्स
    (D) रॅडक्लिफ ब्राऊन

30. लेवी-स्ट्राऊस यांनी संरचनेचे वर्णन असे केले की :
    (A) रचित किंवा अमूर्तता
    (B) आंतरक्रियात्मकता किंवा प्रक्रिया
    (C) वास्तव किंवा प्रकार्यिक समग्रता
    (D) सामूहिक जाणिवेचे प्रतिबिंब



www.StudentBounty.com

StudentBounty.com



31. Which of the following creates gender roles in a society ?

(A) Biological differences

(B) Education

(C) Socialization

(D) Political institution

32. Consider the following statements :

Assertion (A) : Caste and class continue to coexist in Indian society.

Reason (R) : In general, classes develop broadly within the framework of caste in India.

Of these two statements :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true and (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

31. खालीलपैकी कोणत्या घटकामुळे समाजामध्ये लिंगभाव निर्माण होतो ?

(A) जैवीक भिन्नता

(B) शिक्षण

(C) समाजीकरण

(D) राज्यसंस्था

32. खालील विधानांचा विचार करा :

**प्रतिपादन** (A) : भारतीय समाजात जाती आणि वर्ग यांचे सातत्यपूर्ण सहअस्तित्व दिसते.

**कारण** (R) : भारतीय समाजात सामान्यत: वर्गांचा विकास जातीव्यवस्थेच्या चौकटीत घडून येतो.

वरील दोनपैकी :

(A) (A) व (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत पण (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे पण (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे पण (R) बरोबर आहे



www.StudentBounty.com

StudentBounty.com



33. Which term sociologists use to refer to "an organised system of social relationships which embodies certain common values and procedures, and meets certain needs of society" ?

(A) Social organization

(B) Social group

(C) Social institution

(D) Social relationship

34. Match the following and select the correct answer from the codes given below :

| | **Methods** | | **Sociologists** |
|---|---|---|---|
| (*a*) | Multivariate analysis | (*i*) | B. Malinowski |
| (*b*) | Ethnography | (*ii*) | H. Garfinkel |
| (*c*) | Ethnomethodology | (*iii*) | M. Weber |
| (*d*) | Verstehen | (*iv*) | E. Durkheim |

*Codes* :

(A) (*a*)-(*iv*), (*b*)-(*ii*), (*c*)-(*iii*), (*d*)-(*i*)

(B) (*a*)-(*i*), (*b*)-(*iv*), (*c*)-(*iii*), (*d*)-(*ii*)

(C) (*a*)-(*iii*), (*b*)-(*iv*), (*c*)-(*ii*), (*d*)-(*i*)

(D) (*a*)-(*iv*), (*b*)-(*i*), (*c*)-(*ii*), (*d*)-(*iii*)

33. ''सामाजिक संबंधांची एक संघटित व्यवस्था की ज्यामध्ये काही विशिष्ट समान मूल्ये आणि कार्य पद्धती व समाजाच्या विशिष्ट अशा गरजपूर्तींचा समावेश केलेला असतो'' त्यासाठी समाजशास्त्रज्ञ कोणती संज्ञा वापरतात ?

(A) सामाजिक संघटना

(B) सामाजिक समूह

(C) सामाजिक संस्था

(D) सामाजिक संबंध

34. जोड्या लावा आणि उचित पर्याय खाली दिलेल्या कोडामधून निवडा :

| | **पद्धती** | | **समाजशास्त्रज्ञ** |
|---|---|---|---|
| (*a*) | बहुचर विश्लेषण | (*i*) | बी. मॅलिनॉवस्की |
| (*b*) | लोकालेख | (*ii*) | एच. गार्फिंकल |
| (*c*) | लोकान्वयपद्धतीशास्त्र | (*iii*) | एम. वेबर |
| (*d*) | वेर्स्टहन | (*iv*) | इ. दुर्खिम |

**संकेत :**

(A) (*a*)-(*iv*), (*b*)-(*ii*), (*c*)-(*iii*), (*d*)-(*i*)

(B) (*a*)-(*i*), (*b*)-(*iv*), (*c*)-(*iii*), (*d*)-(*ii*)

(C) (*a*)-(*iii*), (*b*)-(*iv*), (*c*)-(*ii*), (*d*)-(*i*)

(D) (*a*)-(*iv*), (*b*)-(*i*), (*c*)-(*ii*), (*d*)-(*iii*)



www.StudentBounty.com

StudentBounty.com



35. A small-scale preliminary study conducted before the main research in order to check the feasibility of research is known as :

(A) Pre-testing

(B) Pilot study

(C) Quick survey

(D) Sample study

36. What is the distinctive feature of community ?

(A) Formal social relationships

(B) We-feeling

(C) No definite territory

(D) Individual's feeling of dependency

37. According to Mead, an action that implies reaction is termed as .........

(A) Gesture

(B) Social action

(C) Act

(D) Symbol

35. मुख्य संशोधनापूर्वी संशोधनाची शक्याशक्यता तपासण्यासाठी केलेला छोट्या प्रमाणावरील पूर्वाभ्यासाला ........................ म्हणतात.

(A) पूर्व चाचणी

(B) पथदर्शी अभ्यास

(C) जलद सर्वेक्षण

(D) नमुना अभ्यास

36. समुदायाचे प्रभेदक लक्षण कोणते आहे ?

(A) औपचारिक सामाजिक संबंध

(B) 'आम्ही' ची भावना

(C) निश्‍चित भू-प्रदेश नाही

(D) व्यक्तीची अवलंबित्वाची भावना

37. मीडच्या मताप्रमाणे, जी क्रिया, प्रतिक्रिया सूचित करते तिला पुढीलपैकी कोणती संज्ञा वापरली जाते ?

(A) हावभाव

(B) सामाजिक क्रिया

(C) कृती

(D) प्रतिक



www.StudentBounty.com

StudentBounty.com



38. Who used the term 'Social Microscope' to denote 'Case Study' ?

(A) Thomas and Znaniecki

(B) Burgess

(C) Durkheim

(D) Max Weber

39. Arrange the following concepts as they are sequenced in Talcott Parsons' theory of social system and identify the correct sequence :

(*i*) Latency

(*ii*) Integration

(*iii*) Adaptation

(*iv*) Goal attainment

Sequence codes :

(A) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(B) (*ii*), (*iii*), (*iv*), (*i*)

(C) (*iii*), (*iv*), (*ii*), (*i*)

(D) (*iv*), (*iii*), (*ii*), (*i*)

38. व्यष्टी अध्ययनाच्या निर्देशनासाठी 'सामाजिक सूक्ष्मदर्शक' ही संज्ञा कोणी वापरली ?

(A) थॉमस आणि झनैकी

(B) बर्जेस

(C) दुरखाईम

(D) मॅक्स वेबर

39. खालील संकल्पना टालकॉट पार्सन्सच्या सिद्धांतात ज्या क्रमाने मांडल्या आहेत त्यानुसार त्यांचा क्रम ठरवा आणि खालीलपैकी अचूक क्रम कोणता ते ओळखा :

(*i*) लेटेन्सी

(*ii*) इन्टीग्रेशन

(*iii*) अडेप्टेशन

(*iv*) गोल अटैनमेन्ट

**क्रम संकेतांक :**

(A) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(B) (*ii*), (*iii*), (*iv*), (*i*)

(C) (*iii*), (*iv*), (*ii*), (*i*)

(D) (*iv*), (*iii*), (*ii*), (*i*)



www.StudentBounty.com

StudentBounty.com



40. Which of the following is associated with qualitative research ?

(A) Oral history

(B) Sampling

(C) Hypothesis

(D) Questionnaire

41. A distinct set of institutions having absolute authority to make the rules which govern society is termed as ................

(A) Political party

(B) Government

(C) The State

(D) Judiciary

40. गुणात्मक संशोधनाशी खालीलपैकी काय संबंधित आहे ?

(A) मौखिक इतिहास

(B) नमुनापद्धत

(C) गृहितक

(D) प्रश्नावली

41. समाजाचे नियमन (शासन) करण्यासाठी आवश्यक असणारे नियम तयार करण्याचा अधिकार असणाऱ्या संस्थांच्या प्रभेदक संचांचा निर्देश करण्यासाठी कोणती संज्ञा वापरली जाते ?

(A) राजकीय पक्ष

(B) सरकार

(C) राज्यसंस्था

(D) न्यायव्यवस्था



www.StudentBounty.com

StudentBounty.com



42. Which one of the following is *not* the basis for Weber's classification of social action ?

(A) Modes of articulation

(B) Situation

(C) Goal of action

(D) Negation of value

42. खालीलपैकी कोणता वेबर यांच्या सामाजिक कृतींच्या वर्गीकरणाचा आधार **नाही** ?

(A) वैचारिक सुसूत्रीकरणांची रूपे

(B) परिस्थिती

(C) कृतीचे उद्दिष्टे

(D) मूल्यांचा नकार

43. Select the *correct* statement :

(A) Mores are more strictly implemented than the folkways

(B) Folkways are more strictly implemented than the mores

(C) Mores and Folkways are equally treated in society

(D) Mores are parts of oral while folkways are parts of written tradition

43. योग्य विधान निवडा :

(A) लोकरूढीपेक्षा लोकनीतींची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे केली जाते

(B) लोकनीतींपेक्षा लोकरूढींची अंमल-बजावणी अधिक काटेकोरपणे केली जाते

(C) लोकनीती आणि लोकरूढी समाजात एकसारख्याच मानल्या जातात

(D) लोकनीती म्हणजे मौखिकाचा भाग असतो तर लोकरूढी लिखित परंपरांचा भाग असतात



www.StudentBounty.com

StudentBounty.com



44. Consider the following statements :

Assertion (A) : The process of economic development has not benefitted substantially the backward communities.

Reason (R) : The perpetual backwardness of these communities is attributable to their cultural traits.

Of these statements :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true and (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (R) is true but (A) is false

44. खालील विधानांचा विचार करा :

**प्रतिपादन** (A) : आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा मागासवर्गीय समुदायाना फारसा लाभ झाला नाही.

**कारण** (R) : या समुदायांचा मागासपणा त्यांच्या सांस्कृतिक गुणवैशिष्ट्यांमुळे निर्माण होतो.

वरील विधानांपैकी :

(A) (A) आणि (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत पण (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे पण (R) चूक आहे

(D) (R) बरोबर आहे पण (A) चूक आहे



www.StudentBounty.com

StudentBounty.com



45. Who of the following developed 'folk-urban continuum' ?
    (A) Kroeber
    (B) Lipton
    (C) Marriot
    (D) Redfield

46. Which of the following is an example of quasi group ?
    (A) Family
    (B) Play group
    (C) Income group
    (D) Trade Union

47. Which of the following is *not* an agency of socialization ?
    (A) Family
    (B) School
    (C) Court
    (D) Media

45. खालीलपैकी कोणत्या विचारवंताने 'लोक-नागरी सातत्य' ही संकल्पना मांडली ?
    (A) क्रोबर
    (B) लिप्टन
    (C) मॅरिएट
    (D) रेडफील्ड

46. खालीलपैकी कोणते क्वासी समुहाचे उदाहरण आहे ?
    (A) कुटुंब
    (B) खेळ समूह
    (C) आर्थिक समूह
    (D) कामगार संघटना

47. खालीलपैकी कोणते समाजीकरणाचे साधन **नाही** ?
    (A) कुटुंब
    (B) शाळा
    (C) न्यायालय
    (D) माध्यमे



www.StudentBounty.com

StudentBounty.com



48. Pick the *incorrect* pair :

(A) Cluster Sampling — Probability sampling

(B) Quota Sampling — Probability sampling

(C) Systematic Sampling — Non-probability sampling

(D) Purposive Sampling — Non-probability sampling

49. A study of a village over an extended period of time, collecting data at time intervals is known as :

(A) Longitudinal study

(B) Latitudinal study

(C) Comprehensive study

(D) Before and after study

50. Which of the following is *not* a characteristic of usable hypothesis ?

(A) Empirical verifibility

(B) Conceptual clarity

(C) Theoretical reference

(D) Generality

48. चुकीचा जोडी निवडा :

(A) पुंज नमुना — संभाव्यता नमुना

(B) कोटा नमुना — संभाव्यता नमुना

(C) व्यवस्थाबद्ध नमुना निवड — गैरसंभाव्यता नमुना

(D) सहेतुक नमुना — गैरसंभाव्यता नमुना

49. एका खेड्याचा असा दीर्घकाळपर्यंत केलेला अभ्यास, की ज्यात ठराविक कालांतराने तथ्ये संकलित केली जातात त्या अभ्यासाला काय म्हणतात ?

(A) लाँजिट्यूडिनल अभ्यास

(B) लॅटिट्यूडिनल अभ्यास

(C) समग्र अभ्यास

(D) आधी व नंतर केलेला अभ्यास

50. खालीलपैकी कोणते वापरण्याजोग्या गृहितकाचे वैशिष्ट्ये **नाही** ?

(A) अनुभवनिष्ठ पडताळणी शक्य असते

(B) संकल्पनात्मक स्पष्टता

(C) सैद्धांतिक संदर्भ

(D) सार्वत्रिक वितरण



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**ROUGH WORK**



www.StudentBounty.com

**ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**F**

# Paper-II
# SOCIOLOGY

Seat No. [ ]

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. [ ]

(To be filled by the Candidate)

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) ................................................

2. (Signature) .........................................

(Name) ................................................

## FEB - 14213

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्याय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी आवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.StudentBounty.com